## अपर जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे कार्यालय

रा.मा.क्र. २९/एन.ए.पी-३४/१९९९-२०००
मौजा-पिंपळगांव ता.यवतमाळ

आवेदक :सौ.सुशिलाबाई फुलचंद अग्रवाल
रा .यवतमाळ ता जि यवतमाळ

### आदेश

( पारीत दिनांक३१/ ७/२०१४ )

मौजा पिंपळगांव ता.यवतमाळ येथील स.नं./गट क्र. २०/१/२ क्षेत्र ०.९० हे.आर, भोगवटदार वर्ग १ शेतजमीन निवासी प्रयोजनाकरीता अकृषीक करण्याची परवानगी मिळणेबाबत आवेदक सौ.सुशिलाबाई फुलचंद अग्रवाल रा .यवतमाळ ता जि यवतमाळ यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४४ (१) अन्वये, या कार्यालयास दिनांक १४/९/१९९९ रोजी विहीत नमुन्यात आवश्यक कागदपत्रासह अर्ज सादर केला असून सदर प्रकरणात आवेदक यांनी सदर शेत जमीन निवासी प्रयोजनासाठी अकृषक परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रकरणात अकृषक परवानगी देण्यासंबंधी या कार्यालयाचे पत्र क्रमांक/अका/जमाबंदी /कावि/१२५५/१९९९ दिनांक १३/१२/१९९९ अन्वये सर्व संबधित कार्यालयाचे अभिप्राय मागविण्यात आले, तसेच प्रकरणात दिनांक १३/१२/१९९९ रोजी जाहीरनामा काढण्यात आला व त्यामध्ये वरील जमीनी बाबत हितसंबध असणाऱ्या ज्या व्यक्तींना आक्षेप व हरकती घ्यावयाच्या असतील त्यांनी एक महीन्याचे आंत किंवा तत्पूर्वी या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावे असे सुचित करण्यात आले होते. व या तारखेनंतर आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही असेही स्पष्ट करण्यात आले होते. प्रकरणात मुदतीत कोणताही आक्षेप प्राप्त झाला नाही.

प्रकरणात विहीत मुदतीत संबधित विभागाचे अभिप्राय/नाहरकत प्राप्त न झाल्यामुळे या कार्यालयाचा आदेश दि १४/३/२००५ अन्वये प्रस्तुत अर्ज खारीज करण्यांत आला होता .आवेदकांनी दि ६/३/२०१२ रोजी नव्याने विहीत नमुण्यात अर्ज सादर करुन प्रकरण सुरु करणे बाबत केलेल्या विनंती वरुन प्रकरण पुनश्च सुरु करण्यांत आले.

(१) आवेदक हे जमीनीचे वहीवाटदार /मालक आहेत.

(२) सदर जमीन भूसंपादनाखाली नाही किंवा भविष्यात सार्वजनिक उपभोगाकरीता शासनास आवश्यक वाटत नाही.

(३) सदर जमीन विकास आराखड्यात विशीष्ट प्रयोजनाकरीता राखीव नाही.

ज्याअर्थी उक्त प्रकरणात संबंधित विभागांनी खालील प्रमाणे अभिप्राय प्रकरणात सादर केलेले आहे.

सहाय्यक संचालक, नगर रचना, यवतमाळ यांनी त्यांचे पत्र जा.क्र /रुपांतरण/मौ.पिंपळगांव /स.नं.२०/१/२ /ससय/१७० दिनांक- ३१/१/२००१ नुसार मौणा पिंपळगांव ता.यवतमाळ येथील स.नं./गट क्र. २०/१/२ क्षेत्र ०.९० हे.आर, भोगवटदार वर्ग १ जमिनीचे प्रस्तावित अभिन्यासाला खालील अटी व शर्तीवर मंजूरी देण्याची आणि अभिन्यासा खालील जागेचा वापर निवासी प्रयोजनासाठी अंतीम मंजूरीची शिफारस केली आहे.

१) अभिन्यासातील खुली जागा,रस्ते या व्यतिरिक्त ईतर सर्व भुखंडाचा उपयोग रहीवासासाठी करण्यात यावा.

२) भविष्य काळात अभिन्यास भुखंडाचे विभाजन करु नये.

३) सार्वजनिक उपयोगा करीता प्रस्तावित केलेल्या खुल्या जागेचा उपयोग त्याच कामा करीता करावा व सदर जागा आवेदकाने विनामुल्य स्थानिक प्राधिकरणाकडे व्यवस्थेसाठी हस्तातरीत करावी .

४) अभिन्यासातील विद्युत दाब वाहीनीची आखणी आवेदकाने स्वखर्चाने रस्त्याचे बाजुने करुन घ्यावी.

५) अभिन्यासातील भूखंडकात बांधकाम करतांना ब व क वर्ग नगर परिषदांना लागू असलेल्या बांधकाम विषयक नियमांचे पालन करावे.

६) इतर बाबतीत स्थानिक प्राधिकरणाच्या नियमांचे पालन करावे व पूर्व परवानगीशिवाय कोणतेही बांधकाम करु नये.

७) सदर जागेतील वृक्षाचे सरंक्षण करुन प्रत्येक भूखंडधारकाने वृक्षाचे संवर्धन करावे.

८) अभिन्यासातील रस्ते, नाल्या इत्यादी बांधकाम करुन देखरेखीसाठी स्थानिक प्राधिकरणाकडे विनामुल्य हस्तांतरीत करावे.

९) महाराष्ट्र लॅण्ड रेव्हेन्यू रुल्स, १९६९ (जमिनीच्या वापरातील बदल व अकृषक कर आकारणी) च्या कलम-४ च्या अटीचे पालन करावे.

१०) विषयांकित जागेच्या अभिन्यासाला पिंपळगांव ग्रामपंचायतीची मंजुरी घेण्यात यावी.

११) अभिन्यासाच्या रस्ते ,नाल्या व इतर नागरी सुविधांचा संपुर्ण विकास केल्या शिवाय अभिन्यासातील भुखंडाची विक्री करणे योग्य होणार नाही

१२) अभिन्यासातील हद्दी व क्षेत्रफळ बाबत तफावत अथवा काही वाद उपस्थित झाल्यास ही शिफारस रद्द समजण्यात येईल.

Scanned by CamScanner

वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, यवतमाळ, यांनी त्यांचे पत्र दि.१६/१२/२००२ अन्वये सदर ले-आउटच्या पश्चिम दिशेला नाल्याच्या काठावर प्लॉट नं.२६ च्या जवळ एक विहीर १२ मिटर खोल व ६.०० मिटर व्यासाची विहीर खोदल्यास त्यापासुन अंदाजे २० ते २६ कुटुंबियांना पाणी उपलब्ध होउ शकेल या बाबत प्रमाणपत्र दिले आहे.

ग्रामपंचायत पिंपळगांव यांनी त्यांचे पत्र दि ५/१/२००० अन्वये विषयाकींत शेत अकृषीक करण्यास ग्राम पंचायत पिंपळगांव यांची मासीक सभा दि २२/१२/१९९९ च्या सभेत ठराव क्रं.४(६) नुसार सौ.सुशिलाबाई फुलचंदजी अग्रवाल यांनी ग्राम पंचायत पिंपळगांवला दिलेल्या हमी पत्राचे आधारे नाहरकत परवानगी देण्यांत येत असल्याचे कळविले आहे.

कार्यकारी अभियंता एम एस ई बी यवतमाळ यांनी त्यांचे पत्र दि १५/१/२००० अन्वये विषयाकींत क्षेत्र मधील २०X२० चौ फु जागा आवश्यकता पडल्यास एम एस ई बी ला करीता कॉल सेंटर करीता देण्याचे अटीवर नाहरकत असल्याचे कळविले आहे

उपविभागीय अधिकारी यवतमाळ ,यांनी त्यांचे पत्र दि ७/३/२००० अन्वये विषयाकींत क्षेत्र अनधिकृत अकृषीक वापरात नाही .सदर क्षेत्रास अकृषीक परवानगी देण्यास हरकत नसल्याचे कळविले आहे.

मंडळ अधिकारी यवतमाळ यांनी दि ३/३/२००० अन्वये स्थळ निरिक्षण करुन सदर जमीन बिनशेती कामा करीता योग्य असल्याचे कळविले आहे

कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जिवन प्राधिकरण बांधकाम विभाग क्रं १ यवतमाळ यांनी त्यांचे पत्र दि १७/२/२००० अन्वये सदर ले-आउट ग्रामीण भागातील असल्यामुळे सद्यस्थितीत पाणी पुरवठा करणे शक्य नसल्याचे कळविले आहे.

ज्याअर्थी १) कार्यकारी अभियंता ,सार्वजनिक बांधकाम विभाग,यवतमाळ २) जिल्हा आरोग्य अधिकारी जि प यवतमाळ ३) प्रादेशिक अधिकारी ,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अमरावती ४) कार्यकारी अभियंता इ.एच.व्ही.टि,अमरावती ५) कार्यकारी अभियंता ,पाटबंधारे विभाग ,यवतमाळ ६) भारस्व अधिकारी ,भु संपादन विभाग जि का यवतमाळ ७) तहसिलदार यवतमाळ यांना पत्रव्यवहार करुन सुध्दा विहीत मुदतीत त्यांनी कुठलेही अभिप्राय / नाहरकत प्रमाणपत्र सादर केले नसल्यामुळे सदर जमीन अकृषक करण्यास त्यांची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येत आहे.

वरील सर्व मुद्दे विचारात घेता आवेदकांनी निवासी प्रयोजनाकरीता मागीतलेली परवानगी देण्यास हरकत नसावी. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४४ (१) व शासनाचे व महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाचे परिपत्रक क्रमांक-एन.ए.पी.-१०८८/प्रक्र १२७५/सी.आर-१९/ल-२/ दिनांक १२.१०.१९८८ नुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये, मी अपर जिल्हाधिकारी, यवतमाळ आवेदक सौ.सुशिलाबाई फुलचंद अग्रवाल रा .यवतमाळ ता जि यवतमाळ यांना मौजा पिंपळगांव ता.जि.यवतमाळ येथील स.नं./गट क्र.२०/१/२ क्षेत्र ०.९० हे.आर. भोगवटदार वर्ग- १ जमीन निवासी प्रयोजनाकरीता खालील अटी व शर्तीवर अकृषक परवानगी मंजूर करण्यात येत आहे.

१) मंजूर करण्यात आलेली अकृषीक परवानगी महा. जमीन मह.अधिनियम१ ९६६ व त्या नियमांचे तरतुदीला धरुन असेल.

२)आवेदकास अकृषीक परवानगी ज्या प्रयोजनाखाली मंजूर करण्यात आली त्याच प्रयोजनाकरीता जागेचा वापर करावा.जागेचा किंवा इमारतीचा काही भाग दुस-या प्रयोजनाकरीता उपयोग घ्यावयाचा असल्यास सक्षम अधिका-याची परवानगी घेऊनच वापर करावा.

३) या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेल्या भूखंडाचे विभाजन करता येणार नाही. परंतू सदर अटीचा भंग केला असे आढळून आल्यास आवेदकावर दंडात्मक कार्यवाही म्हणून अकृषक आकारणी एवढा दंड भरुन भूखंडाचे विभाजन करता येईल. भूखंडाचे विभाजन करुन विक्री करुन देण्यापूर्वी भूखंड विभाजनाची परवानगी घेवूनच भूखंडाची विक्री करण्यात यावी त्याशिवाय भूखंड विभाजनाची मंजूरी देण्यात येणार नाही.

४) अभिन्यासातील संपूर्ण भूखंडाचा वापर (सार्वजनिक प्रयोजनकरीता खुली जागा व्यतीरीक्त) निवासी प्रयोजनाकरीताच करावा. स्थानिक प्राधिकरणाच्या विकास योजनेप्रमाणे निवासी भूखंडाचे वापरास परवानगी असेल.

५) अभिन्यासातील एकुण **क्षेत्रफळाच्या ९०१.००** चौ.मि.आरक्षीत म्हणून मोकळी / खुली ठेवतील, व सदर जागा स्थानिक प्राधिकरणास पुढील व्यवस्थे करीता हस्तांतरीत करतील.

६) अभिन्यासातील भूखंड प्रत्यक्ष जागेवर मोजणी /सिमांकन करुन १५०.०० चौ.मी.पेक्षा कमी नसेल व अभिन्यासातील रस्त्याजवळ व लागुन असलेले सर्व्हे नं.समांतर व योग्य रितीने जोडतील.

७) आवेदकाने लेआऊट विकसीत करावा विकसीत केल्याचे या कार्यालयास कळवावे.

८) अभिन्यासातील रस्ते/मो-या व नाल्याचे बांधकाम आवेदक करतील. सदर सुवीधा करुन घेण्याची जबाबदारी **पिंपळगांव ग्रामपंचायतीची** राहील व सुविधा असल्याबाबतची खात्री करुन घेण्याची जबाबदारी ही भूखंड खरेदी करणा-याची राहील

९) आवेदकास अभिन्यासातील भूखंडाचा व्यवहार कोणत्याही प्रकारच्या काल्पनिक अथवा सट्टाबाजीसाठी करता येणार नाही.

Scanned by CamScanner

१०) आवेदक हे अभिन्यासातील जागेवर १००.०० चौ.मी.करीता कमीत कमी एक झाड याप्रमाणे मंजूरी आदेशाप्रमाणे एक वर्षाच्या आंत झाडाची लागवड करुन निगा राखतील. जर सदर अटीचा भंग केल्या दरवर्षी अकृषीक आकारणी एवढी रक्कम दंड म्हणून भरणा करावी लागेल.

११) आवेदक, सहा.संचालक नगर रचना, यवतमाळ, व इतर विभाग यांनी घालून दिलेल्या सर्व शर्ती व अटीचे पालन करणे आवेदकावर बंधनकारक राहील.

१२)अभिन्यासातील आरोग्याचे दृष्टीने योग्य अशा नाल्या व मो-या बांधून घेण्याची जबाबदारी **पिंपळगांव ग्रामपंचायतीची** राहील. व सुविधा असल्याबाबतची खात्री करुन घेण्याची जबाबदारी भूखंड खरेदी करणा-याची राहील.

१३) अभिन्यासातील भूखंड व त्यावरील इमारत जर आवेदकाने विकला किंवा परस्पर निकालात काढला तर या आदेशाची नोंद खरेदी खतात घेणे बंधनकारक राहील.

१४) मंजूर अभिन्यासातील भूखंडावर इमारतीचे बांधकाम स्थानिक प्राधिकरणाचे मंजूरी शिवाय करण्यात येवू नये.उर्वरीत मोकळया जागेवर कोणतेही बांधकाम करु नये .व ते मोकळे किंवा खुले ठेवावे लागतील.

१५) आवेदक मंजूर आदेशापासून एक वर्षाचे आंत अभिन्यासातील अकृषीक वापर सुरु करतील किंवा सक्षम अधिका-यांकडून मुदत वाढवून घेतील. मुदत वाढ न घेता जागेचा अकृषीक वापर सुरु केला असेल तर मंजूरी आदेश आपोआप रद्द होईल व त्याबाबतची जबाबदारी आवेदकावर राहील.

१६) आवेदकास मंजूर अभिन्यासातील भूखंडावर प्रस्तावित इमारत किंवा दुसरे बांधकाम करण्यापूर्वी स्थानिक प्राधिकरणाची व नगर रचना विभागाची परवानगी घ्यावी लागेल. मंजूर बिलडींग प्लॅन प्रमाणेच बांधकाम करावे लागेल.

१७) आवेदक, अकृषीक वापर सुरु केल्याचा दिनांक तहसिलदार, **यवतमाळ** यांना देवून तलाठी, पिंपळगांव मार्फत कळवतील. अकृषीक वापर सुरु झाल्यापासून एक महिण्याच्या आंत असे न कळविल्यास महाराष्ट्र जमीन महसूल, (जमीनीच्या वापरात बदल व अकृषीक आकारणी ) नियम,१९६९ चे कलम ६ प्रमाणे कारवाईस पात्र राहतील.

१८) आवेदकास ज्या प्रयोजनाकरीता जागेचा वापर सुरु केला असेल त्या दिनांका पासून मंजूर दराप्रमाणे निवासी प्रयोजनाकरीता रुपये ०.१० चौ.मी.प्रमाणे आकारणीचा भरणा करावा लागेल.

**--परिशिष्ट --**

| अ. क्र. | तपशिल | क्षेत्रफळ चौ.मि | अकृषीक आकारणी निवासी प्रयोजनासाठी प्रति चौ.मी. रु.०.१० पै. |
|---|---|---|---|
| १ | निवासी भूखंडाखालील क्षेत्रफळ | ४८१५.३९ | ४८२/- |
| २ | ओपन स्पेस खालील क्षेत्रफळ | ९०१.०० | |
| ३ | रस्त्याखालील क्षेत्र | ३२८३.६१ | |
| | एकुण- | ९०००.०० | ४८२/- |

१९) वार्षीक अकृषीक आकारणी रुपये ४८२/- अक्षरी (रुपये चारशे ब्यानशी फक्त) दिनांक १.८.२०१३ ते ३१.७.२०१४ या कालावधीसाठी राहील.

२०) सदर अभिन्यास हा अ वर्ग नगर परिषदेच्या परिघातील हद्दीत येत असल्यामुळे कलम ४७ अ नुसार परावर्तीत कर (४८२ X ५) = २,४१०/- आकारण्यात येत आहे.

२१) दर पांच वर्षानी पुनर्विलोकन होईल त्यावेळी शासन राजपत्रात प्रसिध्द झालेल्या दरानूसार सुधारीत रक्कम व फरकाची रक्कम भरणा करणे, आवेदकास बंधनकारक राहील.

२२) आवेदकाने शासनाच्या सुधारीत आदेशाप्रमाणे मोजणी फी (भूखंड निहाय) चा भरणा केला आहे व उप अधिक्षक भूमी अभिलेख, यांनी अभिन्यासा प्रमाणे भूखंडाची मोजणी करुन दिलेली आहे.

२३) भूखंडधारकाने मंजूर प्लॅनप्रमाणे बांधकाम केले असल्यास त्यात पुन्हा सुधारणा वा बदल करावयाचा असल्यास सक्षम अधिका-याचे पूर्व परवानगी शिवाय बांधकाम करता येणार नाही.

२४) आवेदक, वरील नियमावलीतील परिशिष्टाप्रमाणे सनद तयार करुन देतील व एक महीन्याचे आंत अकृषीक वापर सुरु करतील.

२५) आवेदकांनी आदेशातील कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास दिलेली परवानगी रद्द केली जाईल, किंवा अकृषीक आकारणी एवढा दंड भरणा करावा लागेल.

२६) अकृषीक आकारणी बाबत **परिशिष्ट एक** सोबत जोडले आहे.

२७) वरील पैकी कोणत्याही अटी किंवा शर्तीचा भंग झाला असे आढळुन आल्यास अनधिकृत बांधकाम समजण्यात येवून विहीत मुदतीत बांधकाम काढले जाईल व त्यावर आलेला खर्च आवेदकाकडून जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल केला जाईल.

२८) या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेली अकृषीक परवानगी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४ व महाराष्ट्र जमीन महसूल (जमीनीच्या वापरात बदल व अकृषीक आकारणी) नियम १९६९ च्या तरतुदी खाली देण्यात आलेली आहे.

Scanned by CamScanner

यार्थी उपरोक्त सर्व नंबरची मंजूर अभिन्यासानुसार तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख यांचेकडून मोजणी करुन उपरोक्त प्रमाणे अभिन्यासाला अंतीम मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे आणि ज्याअर्थी महसुल व वन विभागा परिपत्रक क्रमांक- आरएएम- १०९०/(२२०४)/ल-६ दिनांक-२७.१२.९० तसेच जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख(म.रा.) पुणे यांचे परिपत्रक क्रमांक-एलआर-२२७/सीआर-३०४९/भू-३/२००१ दिनांक- २० जानेवारी २००१ नुसार ज्या जमिनींना अकृषीक परवानगी देण्यात येते, त्या जमिनीचे बाबत सिटी सर्व्हे ऑफीस कडून भूखंड निहाय मिळकत पत्रीका (Proparty Card) तयार करणे आवश्यक आहे. त्याअर्थी सिटी सर्व्हे ऑफीसर यांनी उपरोक्त अंतीमरित्या मंजूर अभिन्यासाचे भुखंड निहाय मिळकत पत्रिका तयार करुन त्याची प्रत्येकी एक प्रत प्रकरणात अभिलेखा करिता पाठवावी, तसेच उक्त अंतिमरित्या मंजूर अभिन्यासाची नोंद तलाठी यांनी गाव नमुना दोन मध्ये घेवून त्याची प्रत अभिलेखाकरिता पाठवावी, त्याचप्रमाणे भुखंड निहाय ७/१२ बनविण्यात यावे. तालुका निरीक्षक,भूमि अभिलेख यांनी उक्त सर्व्हे नंबरचे कमी जास्त पत्रक तात्काळ तयार करुन अभिलेखा करीता या कार्यालयाकडे तसेच संबंधीत तलाठी यांचेकडे पाठविण्यात यावे आणि संबंधीत तलाठी यांनी प्राप्त कमी जास्त पत्रकानुसार संबंधीत गाव नमुन्यामध्ये नोंद घेऊन या कार्यालयास कळवावे, असे आदेशित करण्यात येत आहे.

अपर जिल्हाधिकारी

( ज्ञानेश शंकर भट )
अपर जिल्हाधिकारी यवतमाळ

पृ.क/अका/अकृषक/कावि/४५७ /२०१४
अपर जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे कार्यालय
दिनांक ३१ / ७ / २०१४

**प्रतिलीपी :-** **माहीती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित**

१) उपविभागीय अधिकारी, यवतमाळ
२) तहसिलदार, यवतमाळ
३) सहाय्यक संचालक, नगर रचना, यवतमाळ
४) तलाठी, पिंपळगांव मार्फत तहसिलदार, यवतमाळ
५) सचिव, ग्रामपंचायत पिंपळगांव ता.यवतमाळ
६) उप अधिक्षक, भूमि अभिलेख, यवतमाळ
७) दुय्यम निबंधक, यवतमाळ
८) आवेदक सौ.सुशिलाबाई फुलचंद अग्रवाल रा .यवतमाळ ता जि यवतमाळ

अपर जिल्हाधिकारी यवतमाळ

Scanned by CamScanner

## परीशिष्ट -१

मौजा पिंपळगांव ता.यवतमाळ येथील स.नं/गट नं.२०/१/२ क्षेत्र ०.९० हे.आर भोगवटदार वर्ग १ जमीन निवासोपयोगी कामाकरीता मंजूर केलेले भुखंडनिहाय वार्षिक अकृषिक आकारणी दर रु.०.१०पैसे प्र.चौ.मि.

| भुखंड क्रमांक | एकूण भुखंड | प्रत्येक भुखंडाचे क्षेत्रफळ चौ.मि. | एकूण भुखंडाचे क्षेत्रफळ चौ.मि. | वार्षिक प्रत्येक भुखंडाचे अकृषिक आकारणी रक्कम रु. | अकृषिक आकारणी दर प्रती चौ.मि. प्रमाणे (रु.०.१०पै.) चौ.मि. वार्षिक अकृषिक आकारणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | १८०.०० | १७६.८६ | १८ | १८ |
| २,३,४ | ३ | १६५.०० | ४९५.०० | १७ | ५० |
| ५,६,७,१०,११,१२ | ६ | १५०.०० | ९००.०० | १५ | ९० |
| ८ | १ | १८७.५० | १८४.३६ | १९ | १८ |
| ९ | १ | १५७.५० | १५४.३६ | १६ | १५ |
| १३ | १ | २०८.०० | २०८.०० | २१ | २१ |
| १४ | १ | १६६.०० | १६६.०० | १७ | १७ |
| १५ | १ | १६५.०० | १६१.८६ | १७ | १६ |
| १६ | १ | १५०.०० | १५०.०० | १५ | १५ |
| १७ | १ | १६५.०० | १६०.६५ | १७ | १६ |
| १८ | १ | १७८.०० | १७८.०० | १८ | १८ |
| १९ | १ | १६०.०० | १६०.०० | १६ | १६ |
| २० | १ | १९२.०० | १९२.०० | १९ | १९ |
| २१ | १ | २२४.०० | २१९.६५ | २२ | २२ |
| २२ | १ | २२०.०० | २२०.०० | २२ | २२ |
| २३ | १ | २२८.०० | २२८.०० | २३ | २३ |
| २४ | १ | १८९.०० | १८९.०० | १९ | १९ |
| २५ | १ | २०४.०० | १९९.६५ | २० | २० |
| २६ | १ | ४७२.०० | ४७२.०० | ४७ | ४७ |
| एकुण | २६ | | ४८१५.३९ | ० | ४८२ |

१. निवासोपयोगी जमीनीचे क्षेत्रफळ ४८१५.३९ चौ.मिटर

२. वार्षिक अकृषिक आकारणी रु. ४८२/- (रुपये चारशे ब्यान्शी फक्त)

अपर जिल्हाधिकारी, यवतमाळ

Scanned by CamScanner